# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 17 August 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १७ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.**

************

***ठळक बातम्या***

- **मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय लाभ प्रदान कार्यक्रमाचं आज पुण्यात आयोजन**
- **महिला बचतगट आणि महिला उद्योजकांच्या उत्पादनांना राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश**
- **घटकपक्षांनी मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केल्यास आपला पाठिंबा– महाविकास आघाडीच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांची ग्वाही**
- **७० वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर–'वाळवी' ठरला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट**

**आणि**

- **धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी सुमारे आठ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड वर्ग**

***सविस्तर बातम्या***

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय लाभ प्रदान कार्यक्रमाचं आज पुण्यात बालेवाडी क्रीडांगण इथे आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातील बहिणींना रक्षाबंधनाची भेट म्हणून रक्षाबंधनाच्या अगोदरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणाऱ्या या कार्यक्रमात महिलांच्या बँक खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यातील लाभ जमा करण्यात येणार आहे.

या राज्यस्तरीय समारंभामध्ये लाभार्थी महिलांना सहभागी होता यावं, यासाठी अनेक ठिकाणी दूरदृश्य प्रणालीद्वारे समारंभाचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे. हिंगोली, नांदेड, लातूर इथे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थी महिलांचा सन्मान करण्यात येणार असून, योजनेसाठी अर्ज भरून घेणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांचाही यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात गौरव करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पात्र महिलांच्या आधार संलग्नित असणाऱ्या बँक खात्यामध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये जमा होण्यास परवापासून प्रारंभ झालेला आहे.
दरम्यान, ही योजना कायमस्वरूपी अशीच सुरु राहणार असल्याचं क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितलं आहे. ते काल लातूर इथे बोलत होते.

****

राज्यातील महिला बचतगट आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आधारीत डिजीटल मार्केटींग ॲप विकसित करण्याची सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. काल मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात याबाबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यासाठी उमेद, राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान-एनयुएलएम, महिला आर्थिक विकास महामंडळ-माविम यांनी एकत्रित येऊन एक व्यासपीठ निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.
शहरांमध्ये बचतगटांची संख्या वाढवावी, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मैदांनावर सुटीच्या दिवशी बचतगटांसाठी विक्री कक्षांची व्यवस्था करून द्यावी. महानगरांमध्ये असे स्टॉल उभारण्यासाठी महापालिकांनी पुढाकार घ्यावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. सध्य राज्यात उमेद अंतर्गत सुमारे सहा लाख, एनयुएलएम अंतर्गत ३१ हजार, माविम अंतर्गत ग्रामीण ८७ हजार आणि शहरी ६५ हजार असे एकूण सात लाख ८२ हजार बचत गट कार्यरत आहेत.

****

राज्य विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेण्यात आला. निवडणुकीला सामोरं जाण्यासाठी महाविकास आघाडी तयार असल्याचं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्याला संबोधित करताना केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि

काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, आपला त्याला पाठिंबा आहे, अशी ग्वाही ठाकरे यांनी दिली.

****

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांची पक्षाच्या कार्यकारी समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून कार्यकारी समितीत स्थान देण्यात आलं आहे.

****

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं काही पक्षांना निवडणूक चिन्हांचं वाटप केलं. यामध्ये वंचित बहुजन आघाडीला गॅस सिलिंडर तर प्रहार जनशक्ती पक्षाला क्रिकेटची बॅट हे चिन्ह मिळालं आहे.

****

महाराष्ट्र राज्यात होणार असलेल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगानं राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलामध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करता येणार आहे. मतदारांना मतदार यादीतील आपल्या नावासोबतच स्वतःचा मोबाईल क्रमांकही जोडता येणार आहे. यात मतदारांसाठी दावे आणि हरकतींसाठी २० ऑगस्ट २०२४ पर्यंतचा कालावधी निश्चित केला गेला आहे.

****

सत्तरावे  राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार काल जाहीर झाले. यामध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार ‘वाळवी’ या चित्रपटानं पटकावला. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं काल या चित्रपट पुरस्कारांची घोषणा केली. नॉन फीचर विभागात साहिल वैद्य दिग्दर्शित ‘आदिगुंजन’ या मराठी माहितीपटानं सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा मान मिळवला. याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना सर्वोत्कृष्ट व्हॉइस ओव्हरसाठी पुरस्कार जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट कला–संस्कृतीविषयक चित्रपटाचा मान सचिन सूर्यवंशी यांच्या ‘वारसा’ या मराठी चित्रपटानं पटकावला. तर ‘आणखी एक मोहंजोदारो’ हा सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक चित्रपट ठरला.

गुलमोहर हा सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट, 'तिरुचित्रम बलम' या चित्रपटासाठी नित्या मेनन तर 'कच्छ एक्सप्रेस' या चित्रपटासाठी मानसी पारेख यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार, 'कांतारा' या कन्नड चित्रपटातल्या भूमिकेसाठी ऋषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार, तर 'ऊँचाई' या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाचा पुरस्कार पोन्नियन सेल्वन भाग १ या तमिळ चित्रपटासाठी ए. आर. रेहमान आणि ब्रह्मास्त्र– भाग १ शिवा या हिंदी चित्रपटासाठी प्रीतम यांना विभागून जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा पुरस्कार 'केसरिया' या गाण्यासाठी अरिजीत सिंग यानं पटकावला आहे.

****

धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि जलसंपदा विभागाची मोकळी जागा वर्ग करण्यात आली आहे. धाराशिवच्या तहसीलदारांनी महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्याकडे या ८ हेक्टर ३० गुंठे जागेचा ताबा सोपवल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. या जागेवर महाविद्यालयाची सुसज्ज इमारत उभारण्यासाठी संकल्पना स्पर्धेच्या माध्यमातून उत्कृष्ट आराखड्याची निवड करण्यात आली आहे. त्याकरिता ५१३ कोटी रूपयांचा सुधारीत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे दाखल करण्यात आला असल्याचंही आमदार पाटील यांनी सांगितलं.

****

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीनं राज्यात ७२ वसतीगृहांची उभारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे इतर मागास घटकातील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या शिक्षणाची मोठी सोय होणार असल्याचं, राज्याचे गृहनिर्माण आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी म्हटलं आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं सावे यांच्या हस्ते इतर मागास वर्गातल्या विद्यार्थ्यांसाठीच्या पहिल्या वसतीगृहाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. या वसतीगृहात ज्यांना प्रवेश मिळणार नाही, त्या विद्यार्थ्यांना सावित्री बाई फुले आधार योजना आणि स्वयंम योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळणार असल्याचं सावे यांनी सांगितलं.

****

लातूर जिल्ह्यातील इतिहासाची साक्ष देणारी वारसा स्थळं आणि त्या संबंधित इतिहासाची माहिती नवीन पिढीला व्हावी यासाठी इतिहासप्रेमी नागरिक, इतिहास अभ्यासक आणि लातूर जिल्हा प्रशासनानं 'लातूर हेरिटेज वॉक' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. काल लातूर जिल्हा स्थापना दिनाचं औचित्य साधून या हेरिटेज

वॉकला सुरुवात आली. यावेळी गंजगोलाई परिसरात पुरणमल लाहोटी शाळेतील विद्यार्थ्यांनी ‘शंभरीची झाली गोलाई…’ या गीतावर नृत्य सादर केलं.

****

परभणी जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमानं "हर घर तिरंगा" या अभियाना अंतर्गत जिल्हास्तरीय देश भक्तीपर समूहनृत्य स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या पाथरी तालुक्यातल्या वडी इथल्या प्राथमिक शाळेनं प्रथम क्रमांक पटकावला.

****

बीड इथं महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांचं निवेदन पालकमंत्री धनंजय मुंडे यांना सादर केलं आहे. ज्येष्ठता यादी, पदोन्नती, यासह विविध प्रश्नांकडे यातून लक्ष वेधण्यात आलं आहे.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव इथल्या उपपरिसरात आज जलसंवाद कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. मराठवाड्यातल्या पाण्याच्या परिस्थितीवर या कार्यशाळेत चर्चा होणार असल्याचं, आयोजकांकडून सांगण्यात आलं आहे.

****

पॅरिस इथं पॅरालम्पिक अर्थात दिव्यांगांच्या ऑलिम्पिक स्पर्धांना २८ ऑगस्टपासून प्रारंभ होत आहे.  आठ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत ८४ खेळाडूंचं भारतीय पथक सहभागी होत आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी या पथकाला शुभेच्छा दिल्या.

****